MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta
UGC
Jr.No.62759
UGC Approved Refereed Journal

# Vidya warta®

International Multilingual Research Journal
Issue-22, Vol-14 Jan.to Mar. 2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned with OKEN Scanner

25) डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे धार्मिक विचार
डॉ. के. एम. गोलेकर, सोनपेठ, जि. परभणी || 110

26) जागतिकीकरण आणि भारतातील उच्च शिक्षणातील महिलांची स्थिती
प्रा. संजय किसनराव चव्हाण, तळोधी बा. जि. चंद्रपूर || 114

27) जी. एं. च्या कथेतील मृत्युचिंतन
डॉ. प्रमदा देसाई, काणकोण गोवा || 117

28) भक्तश्रेष्ठ संत चोखामेळा:एक चिंतण
प्रा. डॉ. आर. बी. धायगुडे, परळी—वैजनाथ, जि.बीड || 120

29) महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार
प्रा. डॉ. क्षीरसागर बी. एस., हिंगोली. || 124

30) मराठी आदिवासी कवितेतील स्त्री चित्रण
डॉ. संभाजी मलघे, तळेगाव दाभाडे || 127

31) संयुक्त महाराष्ट्र चळवळ— यशवंतरावांची भूमिका
डॉ.मीना चंद्रभान साळे, अहमदनगर (महाराष्ट्र) || 130

32) शाळा आणि महाविद्यालयातील शारीरिक शिक्षक व गणितांच्या शिक्षकांचे....
सीमा आर.वाघोदे-डॉ.विशाल व्ही देशपांडे ,औरंगाबाद || 133

33) श्री क्षेत्र पंढरपुर:धार्मिक पर्यटन संधी व समस्या
सौ. सुवर्णा भारत कऱ्हाड, पुणे. || 136

34) मेरे शैक्षिक शोध की चुनौतियाँ एवं अनुभव
संजय कुमार चौरसिया, दिल्ली || 143

35) उच्चतर माध्यमिक स्तर के विद्यार्थियों की किशोरावस्था से सम्बन्धित शैक्षिक एवं....
प्रा पल्लवीबेन जे डाभी, बाकरोल || 148

36) घरेलू एवं कामकाजी माताओं के किशोरों की संवेगात्मक बुद्धि, समायोजन क्षमता....
डॉ. सरोज गुप्ता—राजेश सिंह || 151

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with OKEN Scanner

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® Jan. To March 2018 Issue-22, Vol-14 0110

आरमाराचे महत्व आमात्यांनी ओळखले होते शिवाजी महाराजांनी आरामार बांधले होते मराठे किंवा मोगल यांनी आरमार बांधण्याचा प्रयत्न केला नाही ते जमीनीवर लढत होते. आरमार बद्दल म्हटले आहे. आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. जसे ज्यास अश्वबल जसी त्याची पृथ्वीप्रजा आहे. तद्वतच ज्याच्या जवळ आरमार त्याचा समुद्र आरमार निर्माण करण्याचे कारण समुद्राकाठच्या बंदरावर येणाऱ्या परकीय प्रवाशांवर वचक बसवणे हा होता. तसेच मालावर ज्यांना जकात बसवायचा होता. आरमार बांधतांना लगणारे साहित्य कसे मिळवावे याविषयी सांगतांना आमात्य म्हणतात त्यासाठी लागणारी लाकडे मिळवतांना ते हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे याविराहित जे लागते ते परमुलखीहून खरेदी करून आणवीत जावे रयतेने लावलेली झाडे लेकरा सारखी बहुत काळ जतन करून वाढविली ती झाडे तोडिल्यावर त्यांचे दु:खात पारावार काय?

शिवाजी महाराजांच्या ठिकाणी प्रजेच्या प्रति असलेली आत्मीयत दिसून येते कादाचित एखादे जे झाड बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असले तरी त्याचे धन्यास राजी करून देऊन त्याचे संतोष तोडून न्यावे, आज्ञापत्र हा शिवाजी महाराजांची ध्येय धोरण सांगणारा अतिशय महत्वाचा ग्रंथ आहे.

**संदर्भग्रंथ -**


१) विलास खोले (संपा) आज्ञापत्र, लोकवाङ्मय गृह मुंबई २००८

२) कुलकर्णी अ. रा. (संपा) रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र, मानसन्मान प्रकाशन पुणे, २००४

३) देशपांडे श्री. न. आज्ञापत्र, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २००५


❑❑❑

25

# डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे धार्मिक विचार


**डॉ. के. एम. गोलेकर**
सहाय्यक प्राध्यापक
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी


**************

**प्रस्तावना:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे धार्मिक वृत्तीचे होते. मात्र त्यांची धार्मिक वृत्ती ही सनातनी किंवा प्रतिगामी स्वरूपाची नव्हती तर ती इतर राजकीय विचारवंत, सामाजिक विचारवंत, समाज सुधारक यांच्यापेक्षा खूपच पुरोगामी स्वरूपाची होती. त्यांच्या धार्मिक विचारांवर भगवान बुद्ध, संत कबीर, छत्रपती शिवाजी महाराज, म. फुले व त्यांचे वडील रामजी सपकाळ यांचा तसेच तत्कालिन परिस्थितीचा प्रभाव पडलेला आढळतो. ज्या धर्मात विषमता, कर्मकांडे, अंधश्रद्धा आहे आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यांचा अभाव आहे असा धर्म त्यांना वर्ज्य होता. समता व स्वातंत्र्याची शिकवण देणारा धम्म हवा होता. म्हणून त्यांनी हिंदु धर्माचा सखोल अभ्यास करून त्यात परीवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना असे परिवर्तन करणे अशक्य वाटल्याने त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार व आचरण करण्याचा निर्णय घेतला. बौद्ध धम्मात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्वांचा स्वीकार व चातुवर्ण्य व्यवस्थेस विरोध असल्यामुळेच त्यांनी १४ ऑक्टोंबर १९५६ मध्ये बौद्ध धम्माची दिक्षा घेतली.

सन १९५६ मध्ये आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकाराला असला तरी त्यांनी १३ आक्टों १९३५ मध्येच येवला येथील परिषदेत धर्मांतराचा निर्णय घोषीत केला होता. या नंतर त्यांनी जगातील सर्वच धर्मांचा चिकित्सक अभ्यास करून आपणास आणि आपल्या अनुयायांसाठी कोणता धर्म योग्य राहिल याचा सखोल अभ्यास केला होता. तर काही ठिकाणी अभ्यासासाठी अनुयांयानाही पाठविले होते. दरम्यान अनुयायी मुस्लिम, शिख धर्मात गेले. आंबेडकरांना हवी असणारी तत्वे मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, जैन अशा धर्मात सापडली नाहीत तर ती त्यांना बौद्ध धम्मात सापडली. बाकी सर्व धर्मात



Scanned with OKEN Scanner

त्यांना अस्पृष्यता, विषमता, स्वातंत्र्याचा अभाव, जातीयता, उच्चनिचता आढळून आल्याने त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला. धर्मांतराची घोषणा येवला येथील परीषदेत करताना ते आपल्या भाषणात म्हणाले होते की, चआपले माणुसकीचे साधे अधिकार मिळवण्यासाठी आणि हिंदु समाजामध्ये समान दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी चालवलेली आपली चळवळ व्यर्थ ठरली आहे. त्या चळवळीसाठी व्यतीत केलेले श्रम, काळ आणि धनही वाय गेले आहे. जो धर्म आपल्याला समान दर्जा देईल, समान हक्क देईल आणि सन्मानाने वागवील अशा एखाद्या दुसऱ्या धर्मात जावे असे तुम्हाला वाटत नाही काय? यापुढे समाजाने हिंदु धर्मात न राहता बाहेर राहून स्वतंत्र नागरीकास योग्य असे भवितव्य घर्डविण्याचा प्रयत्न करावा. दुर्दैवाने मी अस्पृष्य जातीत जन्माला आलो हा काही माझा अपराध नाही. परंतू मरताना मात्र मी हिंदु म्हणून मरणार नाही. या नंतर बरोबर २१ वर्षांनी बाबासाहेब आंबेडकरांनी दि. १४ऑक्टों १९५६ ला नागपुर येथे आपल्या अनुयायांसहीत "बुध्म शरण्म गच्छामी," उच्चार करत बौद्ध धम्म स्वीकारला. प्रथम म्हटल्या प्रमाणे आंबेडकरांचे धार्मिक विचार इतर विचारवंता पेक्षा नक्कीच वेगळे व पुरोगामी आहेत. कारण ते धर्माकडे अध्यात्मिक प्रेरणा मिळावी किंवा मोक्ष मिळावा या दृष्टीने पहात नव्हते. त्यांनी सामाजिक समतेसाठी धर्माचा आधार घेतला होता, धर्मांतराकडे त्यांनी दलित मुक्तीचा मार्ग म्हणून पाहीले होते. शिवाय हा बौध्द धम्म भारतीय संस्कृतीचा एक उदात्त भाग राहिलेला होता. या धर्मात जातीभेद, अस्पृष्यता नव्हती. त्यांच्या धर्मांतराच्या घोषणेमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोणता धर्म स्वीकारणार? केव्हा स्वीकारणार? कोठे स्वीकारणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांच्या बौद्ध धम्माची दिक्षा घेतल्यानंतरच्या भाषणात मिळतात ते म्हणतात, मी एकदा अस्पृश्यांच्या प्रश्नांसंबंधी गांधीजींशी चर्चा करीत असताना त्यांना म्हणालो होतो की, अस्पृश्यांच्या प्रश्नांसंबंधी तुमच्याशी माझे मतभेद असले तरी वेळ येईल तेव्हा मी या देशाला कमीत कमी धोका पोहोचेल असाच धर्म स्वीकारील. आज बौध्द धर्म स्वीकारून या देशाचे जास्तीत जास्त हित साधत आहे. बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचाच एक भाग असून या देशाची संस्कृती, इतिहास यांच्या परंपरेला धोका पोहोचणार नाही याची मी खबरदारी घेतली आहे. येथे आंबेडकरांनी राष्ट्रहीत जोपासत असतानाच समजात हितही जोपासले आहे. कारण मुस्लिम, ख्रिश्चन यापैकी एखादा धर्म त्यांनी स्वीकारला असता तर राष्ट्रहिताला धोका निर्माण झाला असता. तसेच सामाजिक आरोग्यातही असमतोल निर्माण झाला असता. बौद्ध धम्म स्वीकारून त्यांनी समाजहित साधले होते. ते म्हणजे इतर सर्व धर्मात अस्पृश्यता, उच्चनिचता, असमानता होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचा अभाव होता. म्हणून स्वातंत्र्य समता बंधुत्वाचा स्वीकार करणारा जातीयता, अस्पृश्यता न पाळणारा, माणसांना माणूसकीने वागविणारा बौद्ध धर्म स्वीकारला होता. धर्म समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्य रूजविणारा असला पाहिजे. धर्म मनुष्या करिता असावा, मनुष्य धर्माकरीता नसावा. जो धर्म माणूस म्हणून ओळखण्यास तयार नाही, जो धर्म पाणी मिळु देत नाही तो छधर्मङ या संज्ञेला अपात्र आहे. जो धर्म शिक्षण मिळू देत नाही, ऐहिक सुख मिळू देत नाही, आपल्या धर्म बांधवाशी माणूसकीने वागण्याची शिकवण देत नाही, तो धर्म नसून रोग आहे. म्हणून धर्म हा सदाचरण व नैतिकतेची शिकवण देणारा असावा. अंधश्रद्धा, दैववाद, विषमता जोपासणारा धर्म त्यांना मान्य नव्हता. हिंदु धर्मातील अवतार कल्पना अमान्य करून धर्मग्लानी आल्यावर मी अवतार घेतो आणि तुमचा उद्धार करतो या गितेतील कल्पनेवर टिका करतात. ती गीते बाबत बोलताना म्हणतात की, गीता म्हणजे गवळयाच्या पोराने गायलेल्या पोवाडा म्हणजे गीता होय. देव अवतार घेईल व आपले ठिक होईल आणि शोषकांची ताकद कमी होऊन शोषीतांचे राज्य येईल अशा आशेवर असलेल्या समाजव्यवस्थेवर सतत घाव घालुन नवीन मुल्यावर आधारीत समाजव्यवस्था निर्माण केली पाहिजे असे आंबेडकरांना वाटत असे. त्यांच्यामते हिंदु धर्माचे तत्वज्ञान सामाजिक संघटनेस उपयुक्त नसून हिंदु धर्मात व्यक्तीला स्थान नाही. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीसी कसे वागावे याची साधी शिकवण देखील हिंदु धर्मात नाही. मात्र एका वर्णाने दुसऱ्या वर्णाशी कसे वागावे याची बंधने हिंदु धर्मात आहेत. हिंदु धर्मातील जातीव्यवस्थेचे मूळ त्यांनी "शुद्र पुर्वी कोण होते" यात स्पष्ट केले आहे. जातीव्यवस्थेचा जनक ते मनुला मानतात. ते हिंदुस्थानाला विषमतेचे माहेरघर संबोधतात. त्यांच्यामते हिंदु समाज हा एक शिडी नसलेला मनोरा असून एक जात एक मजला आहे. या मनोऱ्यात शिडी नाही किंवा एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्गही नाही. ज्या मजल्यात जन्मावे त्याच मजल्यात मरावे. खालच्या मजल्यातील इसम कितीही लायक असला तरी त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातील इसम कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यावर ढकलण्याची कोणाचीही हिम्मत नाही. सजीव, निर्जीव वस्तू ईश्वराची रूपे आहेत, असे म्हणणारे मात्र स्वकीयांचा विटाळ पाळतात.

भारतातील हिंदु समाजाची निर्मिती आर्य, द्रविड, मंगोलियन, सिंधियन यांच्या मिश्रणातून झाली आहे असे ते भारतातील जाती, त्यांची जडण घडण, उगम व विकास या शोध निबंधात म्हणतात. जाती अंतर्गत विवाह यास ते हिंदु धर्मातील जाती व्यवस्थेचे प्रधान वैशिष्ट्ये मानतात. म्हणून जोपर्यंत भारतातील जातीव्यवस्था नष्ट



Scanned with OKEN Scanner

होत नाही तोपर्यंत सामाजिक व राजकीय परिवर्तन शक्य नाही. ते हिंदु धर्माचे तत्वज्ञान या ग्रंथातील हिंदु धर्माच्या तत्वज्ञानाबाबत ते तीन प्रश्न उपस्थितीत करतात.

१) हिंदु धर्म समतेचे तत्व मान्य करतो काय?

२) हिंदु धर्म स्वातंत्र्य मानतो का?

३) हिंदु धर्म बंधुत्वाचे मान्य करते का?

या सर्व प्रश्नांची उत्तरे नाहीत असेच आहे. त्यामुळे त्यांनी हिंदु धर्म सुधारणेसाठी काही उपायही सुचवले होते. परंतू ते अशक्य असल्याने त्यांनी हिंदु धर्म सोडून बौद्ध धम्म स्वीकारला.

**हिंदु धर्म आणि दलित आंदोलने :-**

दलित आंदोलने हा त्यांच्या धार्मिक विचारांचाच एक भाग आहे. कारण त्यांनी जी काही दलित आंदोलने केली तो हिंदु धर्म सुधारणेचा एक भाग होता पण यामध्ये त्यांना अपयश आले. त्यांच्या असे निदर्शनास आले की, हिंदु धर्म व्यवस्था अत्यंत सडली आहे. त्यांच्यावर आता शस्त्रक्रिया होऊ शकत नाही त्यामुळे त्यांनी धर्मांतराचा निर्णय घेतला. त्यांच्या दलित आंदोलनाचे प्रमुख वैशिष्टये म्हणजे ती सर्व १९३५ च्या धर्मांतराच्या घोषणे पुर्वीची आहेत. या सर्व आंदोलनात त्यांनी धर्मसुधारणेचा आणि अस्पृश्यता नष्ट करून समता, स्वातंत्र्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी केलेले प्रयत्न आढळतात परंतू त्यांच्या पदरी अपयश आले.

**महाडचा सत्याग्रह :-**

अस्पृश्यांसाठी सर्व सार्वजनिक ठिकाणे खुली असावीत असा ठराव मुंबई प्रांतिक विधीमंडळाने १९२३ मध्ये पास केला होता. परंतू अनेक दिवस या ठरावाची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे १९२६ मध्ये पुन्हा असा ठराव पास करण्यात आला की, ज्या नगरपलिका, जिल्हा बोर्ड वरील ठरावाची अमलबजावणी करणार नाहीत त्यांचे अनुदान बंद करण्यात येईल. तेव्हा महाडच्या नगरपालिकेने सार्वजनिक ठिकाणे अस्पृष्यांना खुली असावी असा ठराव मंजूर केला. मात्र हा ठराव तसाच धूळ खात पडलेला होता. सन १९२७ ला बहिष्कृत सभेचे अधिवेश महाडला भरले होते तेव्हा तिचे अध्यक्ष डॉ. बी. आर. आंबेडकर होते. या अधिवेशनात वरील ठरावाची अंमलबजावणी करण्याची विनंती त्यांना करण्यात आली. तेव्हा आपणच दलित उद्धाराचे एक पाऊल उचलावे म्हणून चवदार तळयापर्यंत मोर्चा काढून त्यांनी व त्यांच्या अनुयायांनी तळयाचे पाणी प्राशन केले. हा लढा खऱ्या अर्थाने समतेसाठी होता पाण्यासाठी नव्हता. स्वतःला उच्चवर्णीय हिंदु म्हणून घेणारे आपल्याच बांधवांना त्या पाण्याला स्पर्श करण्याचा हक्क नाकारत होते म्हणून हे आंदोलन समतेसाठी, सन्मानासाठी होते. पण ही घटना सवर्ण हिंदुंना आवडली नाही. त्यांनी दलितांवर मोठा हल्ला केला, मोठी दंगल झाली, अनेक लोक जखमी झाले. सनातनी वृत्तीच्या मंडळींनी पंचगव्य, गोमुत्र टाकून तळयाचे शुद्धीकरण केले. ही घटना बाबासाहेबांना जेव्हा समजली तेव्हा समाजाच्या या पुराणमतवादी वृत्तीचा त्यांच्या मनाला धक्का पोहोचला. तेव्हा ते म्हणाले होते की, तुम्ही तळे शुद्ध करून आमची अपवित्रता सिद्ध करण्याचा निच प्रयत्न केला आहे. पण तुम्ही हिंदु धर्माला लावलेला कलंक आम्ही आपल्या रक्ताने धुवून टाकावा असा जर ईश्वरी नेमानेम असेल तर आम्ही स्वतःस अत्यंत भाग्यवान समजतो. या सर्व घडामोडींचा असा परिणाम झाला की, महाड नगरपालिकेने सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांना खुली करण्याचा ठराव रद्द केला. तसेच चवदार तळे खासगी मालकीचे असल्याचे फिर्याद न्यायालयात दाखल करण्यात आली. जो पर्यंत निकाल लागत नाही तो पर्यंत त्याचा वापर दलितांनी करू नये असा न्यायालयाचा हुकूम होता. त्यामुळे परिषेदेने सत्याग्रहाचा बेत पुढे ढकलला. मात्र खवळलेल्या आंबेडकरांनी व त्यांच्या अनुयायांनी समाजव्यवस्थेचा निषेध करण्यासाठी एक प्रतिकात्मक कार्यक्रम २५ डिसेंबर १९२७ पार पाडला तो म्हणजे मनुस्मृती दहनाचा.

**मनुस्मृती दहन :-**

२५ व २६ डिसेंबर १९२७ ला महाड येथे सत्याग्रह परिषद भरली. परिषदेचा मुख्य हेतू चवदार तळ्याचा सत्याग्रह करणे हा होता. पण त्या बरोबर अस्पृश्यांचा निषेध करणाऱ्या मनुस्मृती दहनाचा कार्यक्रम पार पाडला. खरे तर मनुस्मृतीचे दहन करणे हे नियोजित होते असे मानले जाते त्याचे कारण म्हणजे सत्याग्रहास येताना अनेकांनी मनुस्मृतीच्या प्रति विकत आणल्या होत्या. या परिषदेत मनुस्मृती जाळण्यापूर्वी असा ठराव घेण्यात आला की, "शुद्रांना हीन समजणारी त्यांची प्रगती खुंटवणारी, आत्मबल नष्ट करून सामाजिक, आर्थिक, राजकीय गुलामगीरी कायम करणारी पद्धती त्यामुळे हा ग्रंथ पवित्र नावास शोभण्यास अपात्र आहे. माणूसकीचा उच्छेद करणाऱ्या धर्मग्रंथाचा ही परिषद दहनविधी करीत आहे." हा मनुस्मृती दहनाचा कार्यक्रम परिषदेच्या पहील्याच दिवशी पार पडला. यानंतर डॉ. आंबेडकरांवर खूपच टोकाची टिका झाली. तेव्हा मनुस्मृती का जाळली हे बहिष्कृत भारतमध्ये लिहिताना ते म्हणतात की, मनुस्मृती निंदा करणारी आहे. त्यातील उत्पत्ती कुटाळ व कलंक लावणारी आहे. समाजात अनादर वाढवणारी वचने ओतप्रोत भरली आहेत. असमानतेच्या तत्वाची त्यात धुळवट केलेली आढळते. सुधारणावाद्यांना हा ग्रंथ कधीही मान्य नाही आणि तो अस्पृश्य वर्गासही मान्य नाही हे दर्शविण्यासाठी तिचे दहन केले. आमच्या मित्रांचा आक्षेप आहे की, ते जूने बाड आहे. ते जाळण्यात काय अर्थ. मात्र असे



Scanned with OKEN Scanner

बोलण्याचे स्वातंत्र्य आम्हास असते तर बरे झाले असते. या ठिकाणी आंबेडकरांची एखादा ग्रंथ जाळण्याची भूमिका ही प्रतिकात्मक आढळते. कारण एखादा ग्रंथ जाळून परिवर्तन होणार नाही हे ही ते जाणून होते. त्यांचा खरा राग विषमतेचे समर्थन करणाऱ्या समाज प्रवृत्तीवर होता. समाज मनुस्मृतीला जुने बाड समजतच नव्हता. तसे असते तर तिचे दहन करण्याची गरज नव्हती. परंतू हिंदू समाज मनुस्मृतीला पवित्र ग्रंथ मानत होता याचे खरे दुःख आंबेडकरांना वाटत होते. समाज वर्तमान काळातील प्रवृत्तींनाच चिकटून राहत होता याबद्दल त्यांना राग होता. यावरून स्पष्ट होते की, हिंदू धर्मातच राहून धर्म सुधारणेचा, विषमते विरूद्ध लढण्याचा प्रयत्न आंबेडकरांनी केला होता.

**काळाराम मंदिर प्रवेश :-**

काळाराम मंदिर प्रवेशासाठी डॉ. बी. आर. आंबेडकरांनी जवळजवळ ५ वर्ष संघर्ष केला. या संघर्षाला त्यांनी २ मार्च १९३० पासून खरी सुरूवात केली होती. या आंदोलनातही सवर्णांनी अनेक वेळा दलितांना धोका दिला, दंगली घडवून आणल्या, सामंजस्याचे सर्व मार्ग बंद करून टाकले होते. मंदिर प्रवेशासाठी संघर्ष चालू असताना सवर्णांनी त्यांना वेगळी देवालये बांधण्याचा प्रस्ताव ठेवला होता. पण हा प्रस्ताव आंबेडकरांनी नाकारला. मंदिराची गरज वेगवेगळ्या मंदिरांच्या निर्मितीतून भागवणे हा अस्पृश्यता निवारण्याचा मार्ग नव्हे असे म्हणून त्याला आंबेडकरांनी विरोध केला होता. तेव्हा ते म्हणाले होते की, आम्हास एक जात निराळी देवळे नकोत, देवळावाचून आमचे नडत नाही. ज्यांना देव भक्ती करायची त्यांना देऊळच पाहिजे असे नाही. सामाजिक समता, सामाजिक ऐक्यासाठी देवळे हवी आहेत. सामाजिक समता आम्हास हवी आहे. वेळ पडल्यास हिंदुधर्मावर पाणी सोडण्याची आमची तयारी आहे. हिंदु धर्म असे सांगतो की, सर्व मनुष्य ईश्वराची रूपे आहेत. जेथे कोणीही उच्च अथवा निच नाही. ह्या पेक्षा समतेचा मोठा आधार हिंदु धर्मात सापडणे शक्य नाही. अस्पृश्यांचा समतेचा सत्याग्रह अपयशी ठरला तर हिंदूचाच मोठा तोटा होईल. हिंदु धर्म दगडाचा धर्म आहे. त्याच्या पुढे कपाळ फोडून घेतले तरी उपयोग नाही. स्पृश्यांनो हा घ्या तुमचा धर्म असे म्हणून आपोआप परधर्मात जाण्यास अस्पृश्य तयार होतील असा ते इशारा देतात. पुढे ते म्हणतात की, जो धर्म पंक्तिप्रपंच करतो, अस्पृश्यांना जनावरांपेक्षा वाईट वागवीतो, विशिष्ट वर्गातील पिढ्यान पिढ्या नरकयातना भोगावयास लावतो, माणूस म्हणून त्यांना जनावरांनाही मिळणाऱ्या सवलती मिळू देत नाही तो धर्म कसला? तशा धर्मास धर्म हे नावच योग्य नाही. पुढे आंबेडकरांनी दलितांना राखीव जागा मिळाव्या यासाठी लढा उभा केला. त्यावेळी महात्मा गांधी बरोबर वैचारीक मतभेद झाले. त्यातूनच मार्ग काढत आंबेडकरांनी दलितांना राजकिय क्षेत्रात राखीव जागा मिळवून दिल्या. पुढे स्वतंत्र भारताची राज्यघटना निर्माण करण्याची जबाबदारी स्वीकारत घटना मसुदा समितीचे अध्यक्षपद स्वीकारून भारताचे संविधान निर्माण करण्याचे कार्य केले.

**सारांश :-**

डॉ. बी. आर. आंबेडकरांनी अगदी सुरूवातीपासून जे जे कार्य केले त्या सर्व कार्यात राष्ट्रहीत, समाजहीत, समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या घटाकांचा स्वीकार केलेला आढळतो. त्यांनी हिंदू धर्मात अनेक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सामाजिक कार्याच्या प्रत्येक कृतितून सामाजिक समतेचा स्वीकार केलेला आढळतो. पण त्यात सर्वात मोठा अडथळा निर्माण केला तो हिंदू धर्म सनातन्यांनी. हा अडथळा त्यांना धर्म बदलण्यास भाग पाडतो. डॉ. आंबेडकर धर्मांतर करत असतानाही असतानाही समाजहीता बरोबरच ते राष्ट्रहीताला खूप मोठे प्राधान्य देऊन धर्मांतर करतात. त्यामुळे ते प्रथम पासूनच राष्ट्रवादी आणि शेवटपर्यंत राष्ट्रवादीच राहतात.

**संदर्भः-**


१. डॉ. भा. ल. भोळे आधुनिक भारतातील राजकीय विचार.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग १,२,३ महाराष्ट्र शासन.

३. डॉ. साहेबराव गाठाळ, भारतीय राजकीय विचारवंत

४. गोविंद तळवलकर, नौरोजी ते नेहरू.

५. धनंजय किर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर .

६. बहिष्कृत भारत आणि मुकनायक, महाराष्ट्र शासन

७. डॉ. व. भा. पाटील, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत


❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner